# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 21/11/2019 (गुरूवार)
# (सायंकाळ)

---

## खापरखेडा येथील रेडीमेड कपडयाचे दुकान फोडणारे 02 आरोपी जेरबंद
## स्थानीक गुन्हे शाखेची कार्यवाही

पोस्टे खापरखेडा हद्दीतील अन्ना मोड ते कोराडी रोड जाणाऱ्या रोडवरील तबरेज रेडीमेड क्लॉथ स्टोर्स या दुकानात दिनांक 10/04/2019 रोजी रात्री दरम्यान अज्ञात चोराने या दुकानाचे शटरचे कुलूप तोडुन दुकानातील रेडीमेट कपडे शर्ट पॅट अंदाजे अंदाजे किंमत 40,000/—रू चे चोरून नेले. या घटनेची तक्रार पोलीस स्टेशन खापरखेडा येथे दुकान मालक तबरेज नुर मालम शहा रा. चिचोली खापरखेडा यांनी केली. त्यावरून पोलीस स्टेशन खापरखेडा येथे अप क्र 235/19 कलम 457,380 भादवि प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

आज दिनांक 21/11/19 रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाला त्यांचे बातमीदाराकडुन मिळालेल्या बातमीवरून त्यांनी आरोपी क्र 1) प्रफुल उर्फ महदाक किशोर राउत, वय 22 वर्ष, रा. इंदीरा प्रगती नगर, महादुला कोराडी 2) दिनेश रोहीदास गणवीर, वय 45 वर्ष, रा. वार्ड क्र 1 महादुला कोराडी यांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता यांनी सदर दुकानात चोरी केल्याचे कबुल केले. व त्यांचे जवळुन चोरीस गेलेले एकुण 30 शर्ट व 04 फुलपॅन्ट तसेच गुन्हयात वापरलेले हीरो प्लेजर टु व्हीलर असा एकुण 43,000/— रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोन आरोपी व जप्त मुद्देमाल पुढील कार्यवाही कामी पोस्टे खापरखेडा चे ताब्यात दिले.

सदरची कामगीरी मा. पोलीस अधिक्षक श्री राकेश ओला, अपर पोलीस अधिक्षक श्रीमती मोनिका राउत यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार यांचे नेतृत्वात सफौ लक्ष्मीप्रसाद दुबे, पोहवा सुरज परमार, निलेश बर्वे, पोना सत्यशील कोठारे, शैलेश यादव पोलीस शिपाई प्रणय बनाफर, विरेंद नरड व चालक पोना अमोल कुथे यांनी पार पाडली.



## अपघातात मृत्यू

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 17 कि.मी. अंतरावरील एसएस फ्रुट कंपनीसमोर महालगाव येथे दिनांक 20/11/2019 चे 10:30 वा. दरम्यान फिर्यादीचा काकाचा मुलगा नामे– आकाश रत्नाकर गुजर, वय 29 वर्षे, रा. नाचणगाव, ता. देवळी, जि. वर्धा हा त्याच्या एमएच– 32/एसी– 5630 क्रमांकाच्या मोटरसायकलने डहाळी ते सीरा इंजीनियर अॅन्ड सोलुशन कंपनी येथे कामावर जात होता. दरम्यान सीजी–08/एल–3297 क्रमांकाचा ट्रकचा चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन फ्रुट कंपनीमधुन बाहेर काढत असतांना सुरक्षेची काळजी न घेता वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन आकाश गुजर यांच्या मोटरसायकला धडक दिली. या अपघातात आकाश गुजर याचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– योगेश्वर धनराज करडभाजणे, वय 28 वर्षे, रा. वडोदा ता. कामठी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार जंगवाड 8329984101 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. बेला :– अंतर्गत 07 कि.मी. अंतरावरील सोनेगाव ते बेला रोड येथे दिनांक 20/11/2019 चे 09:00 वा. दरम्यान अभिजीत बबनराव बोरकर, वय 23 वर्षे, रा. मलीना अपार्टमेंट, ओमकार नगर, नागपूर हा सोनेगाव वरून बेला मार्गे त्याच्या मोटरसायकलने कळमना गावी जात होता. दरम्यान बेला ते सोनेगाव रोडवरील खडयात त्याची मोटरसायकल अचानक स्लीप झाल्याने तो खाली पडून जखमी झाला. अभिजीत बोरकर यास उपचाराकरीता प्रथम पीएचसी बोरखेडी व नंतर मेडीकल कॉलेज नागपूर येथे भरती केले असता उपचारादरम्यान 20/11/19 चे 11.00 वा. त्याचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी सर तर्फे पोहवा प्रमोद वाळके यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बेला येथे कलम 174 जाफौ कायद्यान्वये मर्ग नोंद करण्यात आलेला आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर